# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९९३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

जा.क्र.मजीप्रा/सस/आस्था-४/ दिनांक - ३१ / ८ /२००७

**विषय -** दिनांक - ८ ऑगस्ट व १३ ऑगस्ट २००७ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०८ व्या सभेचे इतिवृत्त.

दिनांक - ८ ऑगस्ट, व १३ ऑगस्ट, २००७ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०८ वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी यासोबत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

**सोबत - इतिवृत्त.**

**( अजित कुमार जैन )**
**सदस्य सचिव (प्र.व वि.)**

**मा. मंत्री,**
**पा.पु.व स्व. तथा म.जी.प्रा. अध्यक्ष**

५१५ - ६४८
३१/८/०७

सभादा/२४.८.०७
१०८ meeting

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०८ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०८ वी सभा मा. मंत्री, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ८ ऑगस्ट, व १३ ऑगस्ट, २००७ रोजी संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री.अजित पवार, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा. श्री. रणजित कांबळे, राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३. श्री. अजित कुमार जैन, प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, ( प्रशासन व वित्त )
४. श्री. सुनिल सोनी, प्रधान सचिव, वित्त विभाग (वित्तीय सुधारणा), तथा प्राधिकरणाचे सदस्य.
५. श्री. संजय दहासहस्त्र, सदस्य सचिव, (तांत्रिक ) म.जी.प्रा., मुंबई.

**या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

१. श्री. राजेंद्र होलानी, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., पुणे .
२. श्री. हेमंत लांडगे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागपूर.
३. श्री. व्ही. आर. कल्याणकर, मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. श्री. प्र. वा. पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
५. श्री. द. चि. सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई.
६. श्री. बा. शि. पाटील, उप-मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
७. श्री. सु. पु. भातखंडे, कायदा व कामगार अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी. म.जी.प्रा., मुंबई.

मा. मंत्री, जलसंपदा, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव (प्र. व वि.)
म.जी.प्रा.

(४)

मान्यता देण्यात येत आहे. असाही ठराव करण्यात येतो की, बल्क डिपॉझीट देऊन जास्त व्याजदर मिळतो का व तो मिळविण्याचे प्रयत्न करण्यांत यावे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने त्यांच्या मार्गदर्शक तत्वामध्ये नमुद केलेल्या बँकाकडे गुंतवणूक करण्यांत यावी.

**कार्यक्रम बाब क्र.४ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २००४-२००५ च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवाल मंजूरी बाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २००४-२००५ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्याचे विषद करण्यात आले.

याबाबत मा.उपाध्यक्ष यांनी अशी विचारणा केली की, लेखा परिक्षण अहवालामध्ये गंभीर वित्तीय अनियमितता आहे का, यावर लेखा परिक्षणात गंभीर वित्तीय अनियमितता नसल्याचे वि.स.व मु.ले.अ. यांनी खुलासा केला. मा.प्रधान सचिवांनी अशी विचारणा केली की, लेखा परिक्षण अहवालाचा विहित नमुना काय आहे, यावर हा लेखा परिक्षण अहवाल महालेखापालांच्या विहीत नमुन्यात असल्याने तो स्विकारण्यात यावा अशी विनंती करण्यांत आली. हा लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन मान्यतेनंतर वार्षिक अहवालासह विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्यात येणार आहे असे स्पष्ट करण्यात आले. चर्चेअंती पुढील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाचा सन २००४-०५ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालनास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २००४-०५ चा वार्षिक लेखा व लेखा परिक्षण अहवाल राज्याच्या विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्याकरिता सदर अहवाल शासनाकडे पाठविण्याची संमती देण्यात येत आहे.

[signature] अजितकुमार जैन

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव (प्र. व वि.)
म.जी.प्रा.

(५)

**दि.१३.८.२००७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये वरील विषयावर** पुन्हा चर्चा चालू झाली असता मा.राज्यमंत्री तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, शासनाकडून प्राधिकरणाला योजनांसाठी किती निधी उपलब्ध झाला ते न सांगता प्राधिकरणाचे स्वतःचे उत्पन्न काय आहे याबाबत माहिती द्यावी. यावर कार्यक्रम बाबी सोबत जोडलेले विवरणपत्र मा.उपाध्यक्षांच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर प्राधिकरणाला एकुण त्यांचा कारभार चालविण्यासाठी रु.१३१.८५ कोटी इतका दि.३१.३.२००७ अखेर पर्यंत तुट आल्याचे नमुद केले व यापुढे प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचा-यांचे वेतन भत्ते व निवृत्ती वेतन अदा करण्यासाठी निधी उपलब्ध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. यावर मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांनी असे स्पष्ट आदेश दिले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी नुसते शासनाकडे न पाहाता अंतरिक सुधारणा होणे आवश्यक आहे व हे काम युध्द पातळीवर झाले पाहिजे. प्राधिकरणाची जी कोटयावधी रुपयांची पाणीपट्टीची थकबाकी आहे ती वसुल करण्यासाठी कालबध्द कर्यक्रम आखून त्यातून मिळणा-या निधीतून वेतन व भत्ते, निवृत्ती वेतन अदा करण्याचे नियोजन करावे. तसेच खर्चात काटकसर करुन विजेची बिले कमी करणे, देखभाल दुरुस्तीवरील खर्च कमी करणे, अनअकौंटेड वॉटर कमी करणे, अनधिकृत नळ जोडण्या अधिकृत करुन उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करणे इ.उपाय योजना तातडीने सुरु करण्याच्या सुचना दिल्या. यावर मा.प्रधान सचिवांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिका-यांची तातडीने बैठक घेऊन यावर काय उपाय करावे लागतील या बाबतचा आढावा घेऊन अहवाल देण्याबाबत सूचना केल्या.

प्राधिकरणाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी दर १५ दिवसांनी सदस्य सचिवांनी आढावा घ्यावा, दर महिन्यांनी प्रधान सचिवांनी आढावा घ्यावा व त्यानंतर मा.राज्यमंत्री तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांनी याबाबत वेळोवेळी आढावा घेण्याची इच्छा दर्शविली.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव (प्र. व वि.)
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ९: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या भांडारपाल संवर्गातील कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी १९९६ पासून राज्य वेतन सुधारणा समिती १९९७ या शिफारशीनुसार वेतनश्रेणी लागू करणेबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या भांडारपाल संवर्गातील कर्मचाऱ्यांना शासनाच्या सुधारित वेतनश्रेणीप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याबाबत संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी प्रस्ताव ठेवण्यांत आला असता म.जी.प्रा.च्या गंभीर आर्थिक स्थितीबाबत व वेतन व सेवानिवृत्ती वेतन आणि भविष्यात पुरेशी तरतूद नसल्याबाबत कार्यक्रम बाब क्र.६ सादर करण्यांत आली असल्याने या पार्श्वभूमीवर सुधारित वेतनश्रेणी देण्याची कार्यक्रम बाब मान्य करण्यात येऊ नये, असे चर्चेअंती ठरले.

**ठराव :-**

असा ठराव करण्यांत येतो की, म.जी.प्रा.ची आर्थिक परिस्थिती ठिक नसल्याने वरील कार्यक्रम बाब नामंजूर करण्यांत यावी.

**कार्यक्रम बाब क्र. १०: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या चित्र शाखेतील कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी १९९६ पासून राज्य वेतन सुधारणा समिती १९९७ या शिफारशीनुसार वेतनश्रेणी लागू करणेबाबत.**

कार्यक्रम बाब क्र.९ मध्ये सुचविल्याप्रमाणे सदर कार्यक्रम बाब नामंजूर करण्यांत यावी.

**कार्यक्रम बाब क्र. ११: उल्हासनदीवर बदलापूर येथे बांधण्यात आलेल्या सबमर्ज्ड बंधाऱ्याचा परिसर खाजगी तत्वावर पर्यटन स्थळ म्हणून विकसीत करणेबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीच्या संदर्भात मा. मंत्री तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांनी संचालक मंडळास स्वतः अवगत केले. कार्यक्रम बाबीवर चर्चा होऊन संचालक मंडळाने त्यास मान्यता प्रदान केली. त्याचप्रमाणे दरम्यानच्या काळात मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांनी प्रत्यक्ष जागेवर पाहणी करण्याच्याही सूचना दिल्या. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

अजितकुमार जैन
सदस्य सचिव (प्र. व वि.)
म.जी.प्रा.

१४

**आयत्यावेळची कार्यक्रम बाब क्र. १: महाराष्ट्र पर्यावरण विषयक पायाभूत कंपनी स्थापन करण्याच्या शासनाच्या प्रस्तावाबाबत.**

महाराष्ट्र पर्यावरण विषयक पायाभूत कंपनी स्थापन करण्याच्या शासनाच्या प्रस्तावासंदर्भात शासनाच्या पर्यावरण विभागाच्या दि.२.८.२००७ च्या पत्रातील तपशीलास अनुसरुन बैठकीमध्ये चर्चा झाली. नियोजित MEIDCL या कंपनीच्या प्रस्तावित कार्यक्षेत्रातील सर्व प्रकल्प राबविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला मिळावेत या दृष्टीने उचित प्रस्ताव शासनास सादर करावा असे ठरले.

याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करणे व अनुषंगिक पत्रव्यवहार करणे सासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

अजित कुमार जैन
सदस्य सचिव (प्र. व वि.)
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ९: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या भांडारपाल संवर्गातील कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी १९९६ पासून राज्य वेतन सुधारणा समिती १९९७ या शिफारशीनुसार वेतनश्रेणी लागू करणेबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या भांडारपाल संवर्गातील कर्मचाऱ्यांना शासनाच्या सुधारित वेतनश्रेणीप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याबाबत संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी प्रस्ताव ठेवण्यांत आला असता म.जी.प्रा.च्या गंभीर आर्थिक स्थितीबाबत व वेतन व सेवानिवृत्ती वेतन आणि भविष्यात पुरेशी तरतूद नसल्याबाबत कार्यक्रम बाब क्र.६ सादर करण्यांत आली असल्याने या पार्श्वभूमीवर सुधारित वेतनश्रेणी देण्याची कार्यक्रम बाब मान्य करण्यात येऊ नये, असे चर्चेअंती ठरले.

**ठराव :-**

असा ठराव करण्यांत येतो की, म.जी.प्रा.ची आर्थिक परिस्थिती ठिक नसल्याने वरील कार्यक्रम बाब नामंजूर करण्यांत यावी.

**कार्यक्रम बाब क्र. १०: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या चित्र शाखेतील कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी १९९६ पासून राज्य वेतन सुधारणा समिती १९९७ या शिफारशीनुसार वेतनश्रेणी लागू करणेबाबत.**

कार्यक्रम बाब क्र.९ मध्ये सुचविल्याप्रमाणे सदर कार्यक्रम बाब नामंजूर करण्यांत यावी.

**कार्यक्रम बाब क्र. ११: उल्हासनदीवर बदलापूर येथे बांधण्यात आलेल्या सबमर्ज्ड बंधाऱ्याचा परिसर खाजगी तत्वावर पर्यटन स्थळ म्हणून विकसीत करणेबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीच्या संदर्भात मा. मंत्री तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांनी संचालक मंडळास स्वतः अवगत केले. कार्यक्रम बाबीवर चर्चा होऊन संचालक मंडळाने त्यास मान्यता प्रदान केली. त्याचप्रमाणे दरम्यानच्या काळात मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांनी प्रत्यक्ष जागेवर पाहणी करण्याच्याही सूचना दिल्या. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

अजितकुमार जैन
सदस्य सचिव (प्र. व वि.)
म.जी.प्रा.